जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३३६ दिनांक - २४/०८/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## घरफोडी करणा-या आरोपीस अटक करुन त्याचेकडुन ७२,०००/- रु.चे सोने, चांदीचे दागिने केले जप्त

दि.०३/०७/२०२४ रोजी फिर्यादी यांचे घराचा दरवाजा कुलुप लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे घराचे दरवाज्याचा कोयंडा उचकाटुन घरामध्ये प्रवेश करुन घरातील कपाटातील सोन्याचे नेकलेस चोरी केले तसेच त्याच दरम्यान साक्षीदार यांचे घराचा दरवाजाचे कोयंडा उचकाटुन त्यांचे घरामध्ये प्रवेश करुन त्यांचे घरातील रोख रक्कम, चांदीचे दागिने चोरी केली आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, गुन्हा रजि नंबर ५७५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०५(a),३३१(२) अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेणेकरता वरीष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार यांना आदेश दिले. त्यानुसार नमुद अंमलदार हे अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना त्यांना सदरचा गुन्हा आरोपी नामे **यश संतोष कुचेकर, वय १८ वर्षे, रा. अनिल जाधव यांच्या घरासमोर, खंडाळे चौक, तळजाई वसाहत, पदमावती, पुणे** याने केला असुन तो चोरी करुन झाल्यानंतर त्याचे मुळ गाव बोरी, वालचंदनगर, इंदापुर येथे गेला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी बोरी, वालचंदनगर, इंदापुर येथे जावुन नमुद आरोपीताचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करुन त्यांचेकडुन ७२,०००/- रुपये किंमतीचे सोने चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,.पुणे श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा. पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, श्रीमती नंदीनी वग्याणी,भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.शरद झिने, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमाले, अवधुत जमदाडे, सागर बोरगे, अभिनय चौधरी, हनमंत मासाळ, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, निलेश जमदाडे, सतिश मोरे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, सचिन सरपाले यांनी केली आहे.